## निशाणी क्र. ५९ खाली आदेश

(दिनांक १२ माहे ऑगस्ट २०२६ रोजी पारीत)

०१. वादी क्र. १ ने सदरच्या अर्जाद्वारे वादी क्र. २ च्या मृत्यूमुळे त्याचे वारस अभिलेखावर बदलण्यासाठी आणि त्यायोगे मयताचा दावा बंद झाल्याच्या मान्यता आदेशाला रद्दबातल करून घेण्यासाठी झालेला विलंब माफ करावा, अशी मागणी केलेली आहे.

०२. सदर वादीनुसार, वादी क्र. २ नामे अशोक जगन्नाथ काळे हे दिनांक ११/०५/२०२५ रोजी मौजे कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे येथे दिर्घ आजाराने मयत झालेले आहेत. त्यांना त्यांचे पश्चात पत्नी व दोन मुले असून सदर वादी हा मयत वादीचा सख्खा भाऊ आहे. मयत वादी क्र. २ यांचे मृत्यूनंतर सदर वादी व मयताचे वारस हे दु:खात असल्याने व त्यांची मानसिक स्थिती चांगली नसल्याने मयत वादीचे वारस विहीत मुद्दतीत अभिलेखावर घेता आलेले नाहीत. प्रस्तुत प्रकरण हे स्थावर मिळकतीचे असून त्यातील विवाद्य मिळकतीसबंधी मयत वादीचे हितसबंध गुंतलेले असल्याने त्याचे वारस अभिलेखावर येणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे, अन्यथा सदर वादीचे कधीही पैशात न भरून येणारे नुकसान होईल. तेव्हा मयताचे वारस अभिलेखावर बदलण्यासाठी झालेला विलंब माफ करावा, अशी त्याने विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादींनी सदर अर्जाला विरोध करताना वादी क्र. २ हा दिनांक ११/०५/२०२५ रोजी मयत झालेला असून प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. १ ने २७/०४/२०२६ रोजी दिलेला आहे. प्रस्तुत अर्जास सदर वादीने एक वर्षाचा विलंब केलेला आहे, तेव्हा प्रस्तुत दावा वादी क्र. २ चे विरुद्ध बंद करणे योग्य होईल, अन्यथा मंजूर केल्यास सदर वादीवर रक्कम रुपये ५,०००/— परीव्यय

लादण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०४. सदर वादीच्या वतीने वकील श्री. जी. पी. लावंड यांना तर प्रतिवादींच्या वतीने वकील श्री. व्ही. डी. पवार यांना ऐकले.

०५. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २२ नियम १ अन्वये वादी किंवा प्रतिवादी यांच्या मृत्यूमुळे, जर का त्यांचा किंवा त्यांच्याविरुद्‌ध दावा पुढे चालविण्यायोग्य त्यांना वारस असतील तर तो बंद होत नाही तर नियम ३ अन्वये वादीच्या वारसांच्या अर्जावरुन त्यांना मयताऐवजी अभिलेखावर बदलले जावू शकते. जेव्हा त्या सबंधाने विलंब झाला तर तो न्यायालयाचे समाधान झाल्यावरून की, त्यासाठी पर्याप्त कारण दिलेले आहे, तो विलंब माफ केला जावू शकतो.

०६. हे स्पष्ट आहे की, सदर वादीने प्रस्तुतचा अर्ज करण्यास सुमारे ११ महिने १६ दिवसांचा उशिर केलेला आहे आणि त्या विलंबास स्पष्ट करण्यासाठी त्याच्यानुसार ते दु:खात असल्याने व त्यांची मानसिक स्थिती चांगली नसल्याने मयत वादीचे वारस विहित मुद्‌दतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. ही बाब न स्वीकारण्याचे कारण नाही की कुटूंब सदस्य गेल्यानंतर उर्वरीत कुटुंबिय दु:खात असतात; परंतु वादीने केलेला विलंब हा मोठा आहे, तेव्हा असे म्हणता येणार नाही की, तो सकारण आहे. विलंबाचा कालावधी पाहिला असता सदर वादीने अर्ज करण्यास दिरंगाई केलेली आहे, हे दिसून येते.

०७. उपरोक्त पार्श्वभूमीवर मयत वादीचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे, कारण दावा मिळकत ही मयताच्या वारसांकडे जाणार आहे, तेव्हा त्यांना विवादात सहभागी होण्याचा हक्क आहे.

म्हणून जो काही विलंब झालेला आहे तो माफ करणे आवश्यक आहे, अन्यथा ना मयताच्या मृत्युमुळे दावा बंद होण्याच्या मान्यता आदेशाला रद्दबातल ठरविता येणार आहे, ना वारसांना बदलता येणार आहे. अशा परिस्थितीमध्ये निश्चितच मयताचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. तेव्हा त्यांना मयताऐवजी बदलणे आवश्यक आहे. परंतु अभिलेखावरील वादीच्या दिरंगाईकडे डोळेझाक करता येणार नाही. पक्षकारांनी हे लक्ष्यात ठेवणे आवश्यक आहे की, त्यांच्या दिरंगाईच्या कृतीमुळे ना केवळ सार्वजनिक वेळ आणि श्रम वाया जातात, तर शासन, जे अशा कार्यवाहीवर करदात्यांच्या गोळा केलेल्या महसुलातून स्वस्त न्यायदानासाठी मोठा खर्च करते, त्यास अधिकचा खर्च करावा लागतो. तेव्हा दिरंगाई करणारे पक्षकार शासनाच्या अशा लाभास पात्र ठरत नाहीत, तर ते अधिकचा होणारा खर्च सहन करण्यास जबाबदार ठरतात. हातातील प्रकरणात देखील वादीची कृती ही दिरंगाईची आहे आणि दिलेले दिरंगाईसाठीचे स्पष्टीकरण हे सबळ नाही. तेव्हा अभिलेखावरील वादीवर परीव्यय लादणे आवश्यक आहे, जेणेकरून ना केवळ प्रतिवादींना भरपाई देता येईल, तर शासनाचा होणारा अधिकचा खर्चही भरून निघेल. तेव्हा अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये १०००/— परीव्यय लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. अभिलेखावरील वादीने परिव्यय रकमेपैकी रक्कम रुपये ५००/— प्रतिवादींना भरपाई म्हणून पुढील तारखेपर्यंत हस्ते दिल्यावरून, किंवा देण्यासाठी न्यायालयात जमा केल्यावरून तथा

उर्वरीत रक्कम शासन जमा केल्यावरून त्यास दाव्यामध्ये मयताच्या मृत्युमुळे त्याचा दावा बंद होण्याच्या मान्यतेला रद्दबातल ठरविण्यासाठी आणि मयताच्या वारसांना अभिलेखावर बदलण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येईल;

३. परीव्यय हा अर्जदार/सदर वादीवर राहील.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.08.12 17:45:47 +0530

दिनांक: १२.०८.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | N. V. Koli<br>Stenographer Grade-II |
| Name of Court | : | Civil Judge Senior Division<br>Bhoom, Tq. Bhoom,<br>Dist. Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 12.08.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 12.08.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 12.08.2026 |